
# चैतन्य लहरी

जुलै / ऑगस्ट २००६ अंक क्र. ७/८











# अनुक्रमणिका


- गुरुपूजा २००६ -कबेला ........ २
- प्रेममयी असे १००० महिने......गौरव समारंभ, २१,२२ जुलै ........ ३
- श्री गणेश पूजा - प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश) ........ ६
- स्वाधिष्ठान - चक्र ........ ९
- संत ज्ञानेश्वर आणि भावंडे ........ १२
- ईस्टर पूजा- प.पू. श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश) ........ १७


प.पू.श्रीमाताजींची साकार दिवाळी पूजा
श्री शिवछत्रपती क्रिडा नगरी, महाळुंगे बालेवाडी, पुणे येथे
दिनांक २२ व २३ आक्टोबर २००६रोजी होणार आहे.

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इन्फोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोयीचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

# गुरुपूजा २००६ -कबेला

कबेलाच्या भोवतालच्या टेकड्यांमध्ये हळूवारपणे शनिवारने सूर्यास्त पाहिला आणि सर्व युरोपमधून सहजयोगी येऊ लागले. युरोप,रशिया आणि तुर्कस्थान येथून आलेल्या योग्यांचे एक संमेलनच गुरुपूजेच्या पूर्वसप्ताहात दृष्टीस पडले. गुरुपूजेच्या पूर्वतयारीसाठी बरेच जण आधी आले होते. पुष्कळजण पूर्ण आठवडाभर तेथे राहणार होते.

श्रीमाताजींच्या निवासस्थानापुढील अंगणात सर्वजण जमले. श्रीमाताजींना नम्र अभिवादन करून लहान मुले शांतपणे बसली होती. श्रीमाताजींच्या दैवी सौंदर्याने ती भारावली होती. विस्फारित डोळे, अबोधित चेहरे, हा सर्व आनंद अनुभवत होती. मुलांना मोटारी, चेंडू, खेळण्यातील धनुष्य बाण तर मुलींना सुंदर मूर्ती व दागिने मिळाले. सर्व मुले खूष झाली.

नंतर युवाशक्ती आली. मुलांना पोलो शर्ट तर मुलींना अलंकार मिळाले. नंतर पुरुषांनी प्रवेश केला. श्रीमाताजींना नमस्कार केल्यावर त्यांनाही पोलो शर्ट व सुंदर टाय मिळाले. प्रत्यक्ष श्रीमाताजींकडून मिळाल्यामुळे लहान मुलांप्रमाणेच तेही सर्वजण आनंदले.

नंतर शांतपणे सहजयोगी भगिनी आल्या. त्यांनाही अलंकार देण्यात आले. सर्वांचा आनंद त्यांच्या नजरेतून ओसंडून वाहत होता.

सर्वांची महान द्वारं उघडली गेली आणि सर्वजण आनंदसागरात डुंबू लागले. संगीत चालू झाले. कव्वाली झाल्या. संपूर्ण वातावरण संगीतमय झाले.

त्यानंतर सर सी.पी. श्रीवास्तवसाहेबांनी सर्व सहजयोग्यांना पुढीलप्रमाणे संदेश दिला.

-सहजयोग्यांचे, सहजयोग प्रसार हे ध्येय हवे. श्रीमाताजींनी आत्मसाक्षात्काऱ्यांचे नवे जग निर्माण केले आहे. आता प्रत्येकाला हा आत्मसाक्षात्काराचा प्रसाद मिळाला पाहिजे. म्हणजे ते लोकही दैवी शक्तीशी जोडले जाऊन त्यांच्यातूनही चैतन्य पसरू लागेल.मंगळवार ११ जुलै या दिवशी गुरुपूर्णिमा होती. कबेलामध्ये पूर्णवेळ वाटोळा चंद्र आकाशमध्यावर चकाकत होता. कितीतरी योगी श्रीमाताजींच्या निवासस्थानाभोवती जमले होते. सर्व वातावरण भक्तीने भारावले होते. प्रत्येकजण आपला आदरभाव आणि भक्ती श्री माताजींना अर्पण करण्यासाठी उत्सुक होता.

सुवर्ण नूपुरांनी आणि फुलांनी अलंकृत असे त्यांचे चरणकमलांतील मध पिण्यात सर्व सहजयोगी बंधु भगिनी दंग झाले होते. श्रीमाताजींना गिफ्टस तसेच फुले अर्पण करण्यात आली. एक एक राष्ट्राचे प्रतिनिधी येऊन भेटवस्तू अर्पण करीत होते. नंतर युवाशक्ती व धरमशाळा येथील मुलांनी श्रीमाताजींना फुले अर्पण केली. केंद्रस्थानी श्रीमाताजी आणि सभोवती इतर गुरुंची नावे असा एक भरतकामाचा नमुना इराणतर्फे अर्पण करण्यात आला. ते भरतकाम करण्यास जवळजवळ १९०० तास लागले असे त्यांनी सांगितले.

●●●

## श्रीमाताजींचे इटलीत आगमन

१८ जून २००६ या दिवशी मिलन येथील विमानतळावर प्रचंड उत्साहात श्रीमाताजींचे स्वागत करण्यात आले. त्यामध्ये भरपूर फुले, स्वागतपताका आणि उत्स्फूर्त गाणी यांचा समावेश होता.

श्रीमाताजी कबेल्यात परत आल्यावरचा सर्वांना झालेला आनंद हा अवर्णनीय होता. श्रीमाताजी कबेला येथे आल्यावर वातावरण पुन्हा प्रसन्न झाले. श्रीमाताजी गाडीतून बाहेर पडताक्षणी निरभ्र आकाशात भरपूर फुगे सोडून आनंद व्यक्त करण्यात आला . श्रीमाताजींच्या अवती-भोवती पुष्पवृष्टी करण्यात आली. आरती करण्यात आली.

## प्रेममयी असे १००० महिने......गौरव समारंभ, २१,२२ जुलै

पृथ्वीवर श्रीमाताजींचे अवतरण होऊन १००० महिने झाल्याबद्दल २१ जुलै रोजी एक समारंभ झाला. गुलाबाच्या पाकळ्यांनी सजविलेला एक मोठा केक श्रीमाताजींना अर्पण करण्यात आला. या दिवशी एका स्थानिक वृत्तपत्राने एक पूर्ण पानभर असणारी आणि इटलीतील योग्यांनी लिहिलेली एक प्रसिद्धिका छापली. त्यामध्ये या २५ वर्षांत जे लोकोपयोगी कार्य श्रीमाताजींनी केले आणि आम्हाला आशीर्वाद दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली होती. दुसऱ्या दिवशी La Republica च्या चार आवृत्त्यांमध्ये हेच प्रसिद्ध करण्यात आले. २२ जुलै रोजी इटली आणि आजूबाजूच्या ४ देशांतून शेकडो सहजयोगी बंधु-भगिनी या कार्यक्रमासाठी जमले होते.

त्यारात्री कबेला येथील सहजयोगिनींनी एक नृत्य सादर केले. नंतर सर्वांनी श्रीमाताजींच्या चरणकमलाशी बसून भजने सादर केली. त्यानंतर श्रीमाताजींनी त्यांची-कबेल्यातील १५ वर्षे व २५ वर्षे इटलीतील-ही DVD पाहिली. १००० दिवे प्रज्वलित केले गेले. त्यानंतर सहजयोग्यांची मिरवणूक चालू झाली. नंतर श्रीमाताजींचे सर्वांनी दर्शन घेतले व काही भेटवस्तू अर्पिल्या.

नंतर १ मोठा केक-गुरूंच्या गुरू श्रीमाताजी यांना अर्पण करण्यात आला . त्याच्याबरोबर १० लहान केक्सही होते. १० गुरूंचे प्रतीक म्हणून. हे सर्व चालू असताना , एकीकडे युवाशक्तीने श्रीमाताजींची स्तुतिसुमने असलेली भजने गायली.

## श्रीमाताजी निर्मलादेवींना नागरिकत्व प्रदान कार्यक्रम, दिनांक २९ जून २००६

श्रीमाताजी निर्मलादेवी यांना सन्मान्य नागरिकत्व घोषित करताना अतिशय आनंद होत आहे.

इटलीतील Cabella Ligure, Alessandria यांच्या पालिका कार्यालयाच्या स्थानिक कार्यालयाने सदस्यांची बैठक घेऊन सर्वमान्य, एकमताने श्रीमाताजी निर्मलादेवी यांना इटलीचे सन्मान्य नागरिकत्व अर्पिण्याचे प्रसिद्ध केले आहे. श्रीमाताजींचे लोकोपयोगी कार्य आणि सर्वांचे जीवन समृद्ध करण्याचे त्यांचे व्रत यांच्याकडे लक्ष देऊन, त्यांच्याबद्दल अत्यंत आदर बाळगून त्यांना हे अर्पण करण्यात येत आहे. त्यांनी कबेल्यात वास्तव्य केल्यापासून येथे समृद्धी व शांती प्राप्त झाली आहे.

या सुवार्तेसमवेत श्रीमाताजींना फुले देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी त्या अतिशय प्रसन्न दिसत होत्या. सहजयोगास सहाय्य करणाऱ्यांचे त्यांनी हार्दिक आभार मानले.



## श्री गणेश पूजा

**प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण(सारांश)**

**कबेला, १४ सप्टेंबर २००२**

आत्मा म्हणजे शुद्ध आनंद. हा आनंद तुमच्या मधून प्रवाहित होण्यासाठी श्रीगणेशांचे आशीर्वाद मिळविले पाहिजेत.

आज आपण श्री गणेश पूजनासाठी येथे जमलो आहोत. श्रीगणेश हे अबोधिततेचे (खीलिशलिश)दैवत आहेत.लहान मुलात जन्मत:च अबोधितता असते. श्रीगणेश शक्ती एवढी तीक्ष्ण असते की, कुठल्याही परिस्थितीत मुलांचे रक्षण करते. त्यामुळेच ती प्रिय वाटतात. त्यांच्या निरागसतेची आपण मजा घेतो.

जेव्हा आपली वाढ होत असते त्यावेळी आपले सहस्रार बंद होत जाते आणि बऱ्याच विक्षिप्त गोष्टी आपल्या आत ओढल्या जातात आणि त्या आतच राहतात. आपल्या चारित्र्यावर व नैतिकतेवर अबोधिततेचा मोठा परिणाम होतो. ज्यावेळी तुम्ही निरागस असता त्यावेळी तुम्हाला नैतिकता, अनैतिकता किंवा धूर्तता याचा गंध नसतो. कारण श्री गणेश तुमची काळजी घेतात. त्या स्थितीत कुणीही तुम्हाला इजा करू शकत नाही.जे लोक अबोधितेत असतात ते मोहमाया इ. भौतिक गोष्टीपासून दूर राहतात. त्यांच्या पवित्रतेला कोणी बिघडू शकणार नाही. ही अबोधितता जी आपल्याला प्राप्त झाली ती बरीच पूर्वी (प्रथम)स्थापित केली गेली, हा एक मोठा आशीर्वाद आहे. आपली 'अबोधितता' हा एक मोठा गुण आहे.

'आनंद' हा श्री गणेशांचा विशेष गुण आहे. जसे नुसते लहान बालकाला पाहून आपल्याला आनंद होतो. अजूनही काही सहजयोगी मी पाहते, ते या आनंदापासून दूर आहेत. ते कधी हसत नाही, नेहमी गंभीर असतात. कुठल्याही गोष्टीत त्यांना आनंद वाटत नाही, हे त्यांच्यातील अबोधितता नष्ट झाल्याचे लक्षण आहे. लहान मुलासारखे सहजयोग्यांनीही दुसऱ्याला आनंद दिला पाहिजे. अगदी जसा नवजात बालकात असतो. ज्यांना असा आनंद उपभोगण्याची वृत्ती नाही अशांना कोण मदत करणार? अगदी श्रीगणेशही करणार नाहीत. हा जन्मजात गुण तुमच्यात नसेल तर इतर कुठल्याही गोष्टीत अर्थ राहत नाही, जसे कोणाला अमके जेवण आवडते, कोणाला अमका रंग अवडतो इ. तर गणेशतत्त्वाशिवाय शुद्ध आनंद तुम्ही घेऊ शकणार नाही. नाहीतर एखाद्या वस्तूकडे पहाल तर त्यातील शुद्ध आनंद घेण्या ऐवजी आपलीच बुध्दी चाळवत बसता. उगीच शंका करता, स्पष्टीकरण करण्यात गुंतता. जगात असे अनेक समीक्षक, शंकाकार आहेत, जे गणेशतत्त्वहीन असतात.ते एकमेकावर सतत टीका करत रहातात.ज्याला अंत नसतो, असले लोक एक स्वत:चीच जमात निर्माण करतात.जसा अंगावर एखादा ठणका करणारा फोड यावा, असे ते घातक व अपायकारक ठरतात.

सर्व गोष्टीत, सर्व मुलात व दुसऱ्यांच्या वागण्यातूनही आपल्याला आनंद मिळाला पाहिजे. हा श्री गणेशांचाच आशिर्वाद आहे.कुण्डलिनीचे रक्षण करणे,तिला मार्गदर्शन करणे व सर्व चक्रावर शक्ती देणे, ही गणेशशक्तीची सुंदरता आहे. श्री गणेशांच्या आशीर्वादा शिवाय सहजयोगी कुचकामी

ठरतात.तुम्हांला वाटते गंभीर राहून तुमची उन्नती झाली आहे, परिपक्व झाला असे उगीचच वाटते. उलट तुम्ही दुसऱ्याचे दोष शोधता, दुसऱ्यांना ताप देणारे होता, मग सर्वांना नावडते होता. असा तुमचा स्वभाव होतो कारण त्यात श्री गणेशांच्या अबोधिततेचा अभाव असतो. तुम्हापासून, दुसऱ्याला आनंद देणे श्री गणेशांचा गुण तुमच्याकडे हवा. ते दुसऱ्यांना किती देता यावर तो अवलंबून आहे. यासाठी मला हे द्या, मला अमके पद द्या, वगेरे वगेरे असे तो कधीच मागत नाही. स्वत:च्या दयाळूपणाने विनोदी स्वभावातून तो दुसऱ्यांना आनंदच देत असतो. तो कधीही कोणाचा आपमान करणार नाही, दुखावणार नाही.चुकून तसे झालेच तर हजारवेळा तुमची क्षमा मागेल. अशी आनंदी व्यक्ती खरी सहजयोगी म्हणावी. असे खूप सहजयोगी दिसायला हवे. दुसऱ्यांचे दोष न पाहता दुसऱ्यांचा हेवा न करता त्यांच्यातील चांगले गुण, वैशिष्ट्ये ते पहातात. ते गोरा कां काळा, उच्च की नीच हे सुद्धा त्यांच्या मनात येत नाही. हाच खरा शुद्ध आनंद (अलीश्रींश) आहे.

सध्याच्या या प्रगत युगात लोकात एकमेकांची उणीदुणी काढण्याचे प्रमाण फार वाढले असे वाटते. मी अमक्या कुटुंबातला, अमक्या देशातील असा वेगळेपणा दाखविण्याची वृत्ती दिसून येते. त्यामुळे मोठी समस्या ते निर्माण करतात. हा एक मोठा दुर्गुण आहे. आता मी या धर्माचा त्या धर्माचा या वृत्तीमुळे फार कठीण समस्या निर्माण झालेल्या आहेत. लोक एकमेकांपासून दूर जाऊ लागलेत. काही लोक आपल्या देशाचा उदो उदो करतात व आम्ही कुठेच चुकत नाही असे सांगतात. आम्हीच खरे. आता जे या सर्व खुळचट गोष्टीकडे पाहून त्यांना याचे हसू येते. त्यातील विनोद पाहून ते हसतात, ज्यात कुठेच सत्य दिसून येत नाही. आनंदाच्या कक्षेतच तुम्हाला सत्य सापडेल. असे नसेल तर वरील गोष्टीत तुम्ही दोष पहाल, निराश व्हाल, त्रस्त व्हाल.

जे लोक स्वत:लाच खरे समजतात व इतर सगळे चूक आहेत अशा लोकांना आपण मार्गावर आणले पाहिजे. त्यांना चुकीच्या मार्गावरून न जाण्यास प्रवृत्त केले पाहिजे.या गोष्टीमुळे लोक आपल्या आनंदाला मुकतात. प्रत्येक घटनेत, ती एक आनंदाचा स्त्रोत आहे का हे जाणले पाहिजे. काही जर विकृत वाटले तर त्याकडे विनोद बुद्धीने पहावे व जे सुंदर वाटते त्याची वाहवा करावी. याबाबतीत माझे वडील मोठया खुबीने गंमत बघत. एकदा एका गायकाची माझ्या भावाने स्तुती केली. त्याबाबत माझ्या वडिलांना मी त्यांचे मत विचारले. तर ते उत्तरले, तो आपला स्वत:च्याच मजेत गात होता. लोक जरी नाराज होते किंवा त्याला हसत होते तरी ते दुर्लक्षून तो आपला गातच होता, त्याची धडाडी पहा. तर जाणण्यातील ही सुंदरता, लोकांतील दोषांकडे वेगळ्या दृष्टीकोनातून पाहण्याची ही चांगली वृत्ती आहे. त्यामुळे जे मुळातच चांगले आहे त्याचा तुम्ही आनंद घ्या.

यामुळे अनेक पंथ निर्माण झालेत. उदा कॅथलिक्स व प्रॅटेस्टंट. ते एकमेकांची हेटाळणी करत असतात.यातून काय साध्य होणार? कोण प्रॅटेस्टंट म्हणवतो, कोण कॅथलिक म्हणवतो यात टेहळणी करण्यासारखे काय आहे ? आपणच यात स्वत:ची चूक काय आहे हे पहा. असे विचार कां येतात, दुसरा चूक आहे असे कां दिसते? यातून गट निर्माण होतात. भांडण करतात, तेवढेच मोठे झगडे यातून निर्माण होतात देशांच्या बाबतीतही असेच घडते.उदा. सहजयोगातही एखाद्या देशाचा प्रमुख आपल्या देशाचाच प्रतिनिधी समोर उभा करील. सहजयोग ही वेगळेपणाची ओळख आहे हे सुद्धा ते विसरतात व मी पण मग गंमत करते. मी एका गटातल्या, या लोकांतला, या धर्मातला, धर्म नाही पण या देशाचा, अशी वेगळेपणाची वृत्ती दाखवून त्याला उचलून धरणे योग्य नाही. आपण सर्व वैश्विक कुटुंबातील आहोत हे पहा. आपल्याच लोकांना पुढे करणे हे थांबवा. हे सर्व पाहून तुम्हांला सहजयोगाचे मर्मच समजले नाही त्यामुळे मला दु:ख होते.

सहजयोग हा वैश्विक आहे.(Global) ही सूक्ष्मता फार आनंदायी आहे.सर्व विश्व हे एक म्हणून ईश्वराने निर्माण केले आहे. तर हे देशकारण त्यात लोक एवढे गर्क होतात त्याची वाहवा करतात त्यात एवढे ते स्वत:चाच

ऱ्हास ओढावतात.हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे सर्व पाहून, अगदी हे देशकारण सहजयोगातही पाहून खूप हसू येते. तर ह्या सर्व देशातील लोकांना आपण ठीक केले पाहिजे. त्यांचे दोष दूर करायला हवेत.

मी काही खरे सहजयोगी पाहिले आहेत. ते आपल्या देशात काय बिघडले, कुठला त्रास आहे, लोक कसे आहेत हे सर्व सांगतात, हे आश्चर्यकारक आहे. काही लोक स्वत:बद्दल खोटा समज निर्माण करतात व सूक्ष्मपणे ते सहजयोगा विरुद्ध कसे असतात हे ऐकून नवलच वाटते.ते म्हणतात, हे लोक वैश्विक नाहीत. एकदा तुम्ही वैश्विक जाणिवेत आलात की संकुचितपणाच्या सर्व समस्या नष्ट होतात. आपण आता वैश्विक आहोत आणि या देशकारणापासून दूर राहिले पाहिजे हे त्याच्या लक्षात येत नाही. त्यामुळे तुमचे वैश्विक व्यक्तिमत्व लोप पावते.हे वैश्विक व्यक्तिलव श्रीगणेशच देतात, ते सर्व विश्वाचे आहेत असे लोक भले भारतात अगर इटलीत वा इग्लंडमधे असोत त्यांचे व्यक्तिलव म्हणजे फक्त 'अबोधितता' पूर्ण अबोधितता आणि ते सर्वांना आनंददायी असतात, अशाच लोकांना मान्यता मिळते. जग मानत नाही असे होत नाही. असे लोक जे लिहितात, जे ठरवतात ते सर्व वैश्विक, व्यापक असते. स्वत:च्या वंशाचे लोक स्वत:च्या देशातले असले तरी त्यांच्या दोषावर टीका करतील. लोकांनी गुलामी पत्करू नये. असे लोक ज्या देशाची गुलामी पत्करतात त्याची स्तुती गात असतात. स्वत:च्या आत्म्याद्वारे स्वत:ची ओळख दाखवावी. जो आपल्या आत्म्याचा आनंद असतो तो बाहेर दिसायला पाहिजे. हेच तुमच्यातील गणेशशक्तीचे प्रकटीकरण आहे. स्वत:विषयीच्या अशा वैगुण्याबाबत लीडर्सनी जाणीव ठेवावी. आपल्यातील तसेच दुसऱ्यातील पावित्र्याचा आनंद घ्या. श्रीगणेशाचा हा महान आशीर्वाद आहे की त्यातून तुमच्या शुद्धतेचा तुम्हांला आनंद मिळतो.

सध्याच्या आधुनिक युगात पावित्र्याचा अभाव असून कुणी त्याबद्दल बोलले तर त्याला लोक वेडयात काढतात. फॅशनचा (Fashion)प्रकार एवढा वाढला की एकाने दुसऱ्याचे अनुकरण करावे. विशेषत: स्त्रीया, त्यांच्या विचित्र पोषाखामुळे त्या आपल्या पवित्रतेला मुकतात. पण लहान मुले तशी नसतात. ते अश्या खुळ्या गोष्टीत स्वत:च्याच आढयात वागत नाहीत. त्याबाबत ते जागृत असतात. श्री गणेश शक्ती आपल्या दृष्टीतही आहे व तसे आपण दुसऱ्याकडे पाहिले पाहिजे. भिरभिरत्या दृष्टीचे लोक मी पाहत, त्यांनी आपल्या डोळ्यावरील ताबा सोडला आहे. श्रीगणेश शक्तीच्या लोपामुळे हे घडते.दूषित दृष्टीमुळें तुम्ही सूक्ष्मतेकडे पोहोचू शकत नाही. कुठल्याही गोष्टीवर एकाग्र होऊ शकत नाही.

म्हणजेच श्रीगणेशच आपल्यातील दोष दर्शवितात. उदा. लोकांच हावरेपणा. एखाद्याचा ड्रेस आवडला तर तो त्यांना हवासा वाटतो, सुंदर घर पाहिले तर ते हवे असे वाटते. पण त्या घराची सुंदरता ते पाहत नाही. त्यांना सर्व हवे हवेसे वाटते पण सौदर्यदृष्टी नसते. हे सर्व गैर आहे श्री गणेशांच्या दृष्टीतून आपण विचार केला पाहिजे ते कसे वागतील? कसे निरखावे ? कसे घडवावे ? कसे विचार ठेवावे ? हे आपण लहान मुलांकडून शिकू शकतो. एक मुलगा म्हणाला, मला चंद्र खूप आवडतो का तर तो सारखा धावत असतो आणि तो ढगाआड का लपतो तर तो चालून चालून थकतो. त्याला विश्रांतीची जरुरी असते. पहा ही लहान मुलांची दृष्टी. मुलांना काय योग्य काय अयोग्य याची जाण पाहून अचंबा वाटेल. कसे वागावे, कसे एखाद्या गोष्टीला समजून घ्यावे हे त्यांना समजते. त्यांना ते शिकविण्याची जरूर नाही. कारण देवता त्यांची काळजी घेतात. उंचावरून पडून सुद्धा मुले वाचतात, त्यांना साप किंवा इतर कोणी चावू शकणार नाही. असे म्हणतात वाघ कधी लहान मुलांचा बळी घेत नाही. मुलांची अशी सुरक्षित वाढ कशी? कुठली ही शक्ती? हे विश्व निर्माण करण्याआधी देवीने श्री गणेशांना निर्माण केले. तुमच्यातही ही श्री गणेश शक्ती प्रस्थापित करा.मग तुमचे जीवन उज्वल होते. समाज सुरक्षित असतो, मैत्रीही सुस्थितीत रहाते. मग तेथे कुटिलता हावरेपणाला जागा नसते. स्त्रियांविषयी, द्रव्याविषयी हव्यास याबाबत

दूषित दृष्टीमुळे श्रीगणेश लुप्त होतात. त्यांना फक्त सर्व गोष्टीतून आनंद मिळवायचा असतो, हेच ठाऊक असते. कुठल्याही गोष्टीतून भले ती कोणाकडे असो त्यातील सौंदर्याचा स्वाद घेणे तुम्हाला जमले पाहिजे, हाच तुमच्यातला आनंद आहे. तुम्ही कधीच वृद्ध होणार नाही कारण तुम्ही सतत आनंदात असता. आपल्या आत्म्यावरील पकड ढिली पडली तर तुम्ही आनंदाला मुकता. आत्मा म्हणजे शुद्ध आनंद. हा आनंद तुमच्या आत्म्यातून प्रवाहित होणे हेच तुमचे आनंदी व्यक्तिमत्व. अशी व्यक्ती खूप मजेदार, दुसऱ्याला आनंद देणारी असते. कुणालाही दुखावणार नाही. त्यांना छोट्या छोट्या गोष्टीत सौंदर्य दिसते. निसर्गात जे निर्माण केले गेले ते सर्व अतिशय सुंदर आहे. यामुळे यावर अनेक जण काव्य करू शकतात, पण संख्या कमी आहे.कारण ते प्रेम कहाण्या व इतर क्षुद्र गोष्टीवरच काव्य करतात, ज्यात नैराश्य दिसते. साक्षात्कारी व्यक्ती अशी असू शकत नाही. अशा लोकांनी स्वत:चेच निरीक्षण करावे.

कुठल्याही व्यक्तीकडे पाहून तुम्हाला जेवढाआनंद मिळणार नाही तेवढा लहान मुलांकडे पाहताना येतो. ते जे बोलतात ते ऐकून मजा येते, हसू येते. कारण ते हृदयातून निरागस असतात.मुलांना काय योग्य सांगावे ते महत्त्वाचे आहे. अमके करू नका असे म्हटले तर ते मुद्दामच काहीतरी विक्षिप्त करतील.तसे सुरवातीला ते आज्ञाधारक असतात. दुसऱ्याचे ऐकले पाहिजे हे समजतात, हा त्यांचा भोळा भाव आहे. त्यांना सर्व गोष्टी एकदम सांगू नये. त्यांच्या कलाने घ्यावे. त्यांचा भोळा भाव समजून वागले पाहिजे. शुद्धतेच्या वातावरणात मुलेही शुद्ध रहातात. त्यांची किंमत त्यांना समजली पाहिजे. म्हणून मी नेहमी सांगते मुलांना आपल्या (सहजयोगाच्या)शाळेत ठेवा. पाश्चिमात्यांच्या समाजात मुलांच्या निरागसतेल इजा पोहचते.अशी मुले उदास होतात, आपल्या जवळचे दुसऱ्याला देतील, दुसऱ्याला काय आवडते ते स्वत: होऊन देतील, काय दुसऱ्याला आवडते ते देण्यासाठी जपून ठेवतील.

या मुलांच्या वागणुकीतून, त्यांच्या हसण्यातून त्यांच्या आनंदापासून आपण बोध घेऊ शकतो, कारण त्यांच्यातून श्री-गणेश प्रकाशित होतात. त्यांची हुशारी ते जे काही सांगतात बोलतात यावर जर पुस्तक लिहिले तर ते फार सुंदर होईल.युद्धे, झगडे इ. वर लिहिण्यापेक्षा मुलांच्यावर लिहिणे अधिक चांगले. मुले कधी फॅशनच्या नादी लागत नाहीत. ते आपला पोषाख व्यवस्थित करतील लोकांत व्यवस्थित वागतील. अगदी स्वत:च्या विचाराने स्वत:च्यात पद्धतीत, स्वत:ची पत ठेवून वागतील. कुठल्याही खराब गोष्टीचे प्रदर्शन न करता, स्वत:च्या निरागसतेच्या जाणिवेत असतात. काही लोक आपल्या मुलाकडे दुर्लक्ष करतात. पैशाची समस्या किंवा पतिपत्नीतील संघर्ष यामुळे मुलांकडे दुर्लक्ष होते. मग ते कुठेही बहकतील. असे करणे म्हणजे हे महापाप समजले पाहिजे. कुटुंबातील मुलांचे स्थान गौण समजू नये. घरातील सगळ्यांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. कुठलीही गैर गोष्ट त्यांच्यावर लादली जाऊ नये. त्यांच्या निरागसतेमुळे जे चूक आहे ते त्यांना समजते.

मुलांना कुठलीही गोष्ट लवकर समजते, लवकर शिकतात.विस्तवासारख्या कुठल्याही गोष्टीला हात लागला आणि इजा झाली तर पुन्हा त्या वस्तूला हात लावत नाही.अश्यारीतीने ते वाढत असताना मोठयांनीही काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे. आपण त्यांच्याशी हळूवारपणे, ममतेने वागण्यास शिकले पाहिजे. कुठेही गेले, की मोठया लोकांना उणेदुणे काढण्यात रस असतो. पण मुलांचे तसे नसते कुठेही गेले तर ते तेथील चांगल्या गोष्टी पाहतील, 'त्या घरात श्री गणेशाची सुंदर मूर्ती होती' अशाप्रकारच्या चांगल्या बाबींकडे त्यांची दृष्टी असते.

सध्याच्या मॉडर्न वातावरणात मुले विचित्र स्वभावाची बनु शकतात, त्यांच्या डोक्यात वाईट गोष्टी घुसू शकतात.विशेषत: टेलिव्हिजनवरील दृश्ये त्यांना बिघडवू शकतात.वाईट आवड निवड निर्माण करतात..अत्याचार , हाणामारी अशी दृश्ये त्यांना आवडत नाहीत. पण जेव्हा घरातील मोठया लोकांबरोबर ते पाहतात तेव्हा त्यांच्यापासून ते विपरीत परिणाम करतील, या गोष्टी त्यांच्यापासून दूर ठेवल्या

पाहिजेत.त्यांना सांभाळले पाहिजे.त्यांच्यातील निष्पापतेचा आदर राखला पाहिजे. मुलांना मारहाण करणारे लोक मला बिलकुल आवडत नाहीत. सर्व त्यांच्यावर सोपवा त्यांच्या चांगल्या वागण्याची निरागसतेची तारीफ करा, बिघडलेल्या समाजाची जाणीव करून देऊ नका, ज्यामुळे ते बिघडतील.विशेषत: पैशाची लालूच दाखवू नका ज्यामुळे ही लालूच निर्माण होईल अशा गोष्टी पासून त्यांना दूर ठेवा.

आजकाल लोक फार पैशाच्या मागे लागलेले दिसतात. गैरमार्गाने पैसा मिळवणे हा मूर्खपणा आहे. एखाद्याला वाटते पंचवीस गाडया हव्यात, तो त्या पंचवीस गाड्यात बसणार आहे का? दुसऱ्याचे पैसे लुबाडून त्रास देऊन फसवेगिरी करून मिळविलेल्या संपत्तीपेक्षा,गरीब, असणे उत्तम. हा चुकीचा मार्ग म्हणजे उजव्या बाजूला झुकणे (ठळसहरीं डळवश)

सहजयोगात आपण आधी श्री गणेशांना प्रस्थापित केले जे आपल्या डाव्या बाजूवर आहेत.तर प्रथम तुमची डावी बाजू भक्कम करा, मग उजवीकडे या, सर्वकाही ठीक होईल म्हणून आपण सहजयोगाची उभारणी 'श्री गणेशांवर केली आहे. एकदा गणेश प्रस्थापित केले की सर्व व्यवस्थित असते, सर्व सुज्ञता असते, सर्वकाही स्वच्छ दिसते, कसे रहावे, कसे वागावे. मूर्खता, ईर्षा, हाव या गोष्टींपासून तुम्ही दूर असता.

सुंदर कुटुंबव्यवस्थेत, उत्तम शालेय शिक्षण, प्रेम, उत्तम मार्गदर्शन यामुळे त्यांची वाढ उत्तम होऊन मुले सुंदर घडतील, सर्व सहजयोगी आपल्या मुलांचा योग्य सांभाळ करतील, त्यांची मुले अशा गुणांची व्हावीत असा मी आशीर्वाद देते. कारण ते उद्याचे 'सहजयोगी'होणार. त्यांच्या उगम निरागसतेतून झाला. त्यामुळे ते शुद्ध आहेत. त्या शुद्धतेचा आदर ठेवा. तिचे रक्षण करा. तर मुलांचे महत्त्व जाणून त्यांच्यातील गणेशतत्त्व विकसित करु या.

तुम्हाला सर्वांना अनंत आशीर्वाद

● ● ●

## प्रेम आणि हास्याने भारावलेली एक सायंकाळ
## Chiswick दिनांक २ ऑगस्ट २००६

२ ऑगस्ट २००६ बुधवार रोजी श्रीमाताजींनी यु.के.तील सहजयोग्यांचा निरोप घेतला. संपूर्ण दिवसभर श्रीमाताजी -गप्पागोटी थट्टा, विनोद-प्रसन्न मुडमध्ये होत्या. या गोष्टींमुळे २ ऑगस्ट हा दिवस अतिशय संस्मरणीय ठरला.

त्यांच्यासाठी खास घरी बनवलेली बिस्किटे आणि दार्जिलिंगचा चहा देण्यात आला. त्यांनी त्या बिस्किटांची पाककृती (रेसिपी)विचारली. त्यांना बिस्किटे खूपच आवडली. दार्जिलिंगचा चहा देखील खूप आवडला.

त्या दिवशी Chiswick हॉलमध्ये खूप लोक बसले होते. जिन्यांवर जिन्याखाली जेथे शक्य असेल तेथे, सर्व जण प्रेम -सामूहिकता- दैवी सान्निध्य याचा विलक्षण आनंद लुटत होते. एकूण ती सायंकाळ अविस्मरणीय ठरली.

● ● ●

# स्वाधिष्ठान - चक्र

- आपल्यामधील दुसरे शक्ति केंद्र स्वाधिष्ठान-चक्र आहे; खरे तर हे नाभि-चक्रामधून व्यक्त होत असल्यामुळे तिसरे केन्द्र म्हटले पाहिजे. या चक्रामधून शरीरातील लिव्हर,स्वादुपिंड, प्लीहा, आतडे व किडनी यांचा कांहीं भाग इ. अवयवांचे नियंत्रण करते. त्याला सहा पाकळ्या (Sub-plexuses) आहेत. मुख्यत:सौंदर्यदृष्टी व सर्जनशीलता हे या चक्राचे गुण आहेत.
(प्रवचन अमेरिका, मार्च २००३ दिल्ली)

- या चक्राची डावी बाजू हे शुद्ध विद्येचे स्थान आहे. हीच निर्मल विद्या, अर्थात परमेश्वरी कार्यप्रणालीचे शास्त्र. तुम्हाला अंतिम सत्य समजले आहे व तीच तुमची शक्ती आहे. म्हणून ते शास्त्र तुम्ही नीट समजून घेतले पाहिजे. एकाचे चक्र बिघडले असेल तर तिथे नुसता हात ठेवला तरी ते ठीक होते इतके ते सरळ आणि सोपे आहे. पण आधुनिक म्हणववेल्या लोकांना ते समजत नाही; उलट निरागस असल्यामुळें लहान मुलांना पटकन समजते.
(सहजयोगामध्ये प्रगती हवी. -फ्रान्स )

- निर्मलविद्या तुम्ही पूर्णपणे आत्मसात केली पाहिजे. (फ्रान्स) आणि सहजयोगामधील सर्व तंत्र व पद्धती शिकून त्यामध्यें प्रावीण्य मिळवले पाहिजे. (दिल्ली : चक्रांच्या देवता)

- नुसता -निर्मल विद्या साक्षात- हा मंत्र म्हटला तरी काम होईल कारण तुम्हाला शुद्ध विद्येची शक्ती आत्मसाक्षात्कारातून मिळाली आहे. (आत्मसाक्षात्कारामधून वाढ-कॅक्स्टन हॉल)

- तुम्हा सर्वांना निर्मल-द्वीप (Nirmalites) व्हायचे आहे. जे जे चुकीचे आहे त्याच्या विरोधात उभे राहून केवळ सत्याचा पाठपुरावा करायचा आहे आणि समस्त मानवजातीचा उद्धार करायचा आहे. मग तुम्ही जे काही कराल, जिकडे तुमची दृष्टी जाईल त्यातून तुम्हाला फक्त आनंदाचीच अनुभूती मिळेल.
(गणपतीपुळे, व्हिएन्ना आश्रम)

- निर्मल म्हणजे पूर्णपणें शुद्ध, पूर्णपणे मल-रहित. पूर्णपणे निष्कलंक. म्हणूनच माझे नावही निर्मल आहे आणि तुम्हा सर्वांना शुद्ध करण्यासाठींच मी आले आहे. (गणपतीपुळे, Cheltenham; chelsham Road)हेच निर्मल तत्त्व किंवा जीवनांतील शुद्ध-तत्त्व
(गणपतीपुळे;Meta Modern Era Lay श्रीमाताजी)

- सहज-विद्या हे फार सूक्ष्म पण तितकेच महान , सर्वोच्च प्रतीचे ज्ञान आहे. पण त्याचा विशेष म्हणजे ते प्राप्त झाल्यावर त्याचा अजिबात अहंकार येत नाही; उलट तुम्ही कमालीचे नम्र, साधे-सरळ पण तितकेच प्रभावशाली बनता; फलाभाराने खाली झुकलेल्या वृक्षासारखे तुमचे व्यक्तित्व होते. सर्वव्यापी ईश्वराचे अंश तुम्ही बना आणि त्याच्याशी सदैव समरस रहा. (चेल्शॅम रोड)

- तुम्हाला साक्षीभाव मिळवता आला नाही तर जे ज्ञान तुम्हाला झाले आहे ते अहंकारातून वा प्रतिअहंकारातून आलेले आहे असे समजा; म्हणजे ते पूर्ण ज्ञान नाही; तुम्हाला पूर्णज्ञान मिळवायचे असेल तर तुम्ही स्वत: आधीं पूर्णत्वापर्यंत पोचलेले असले पाहिजेत; त्यावेळीं तुम्ही स्वत: पूर्णपणे स्वच्छ, शुद्ध व निर्मल झालेले असाल. आपल्यामध्ये कमीपणा आहे असे समजून स्वत:चा धिक्कार करू नका; तुम्हीही माणसेच आहात म्हणून काही दोष राहणारच.पण आध्यात्मिक गहनता मिळवल्यावर तुम्ही त्यातून स्वत:ला सुधारू शकता (दिल्ली)

- आत्म्याला जाणल्याने मिळवलेली निरागसता न सांभाळता माणूस वस्तुमार्गाबद्दल बाह्यांतील ज्ञानाच्या मागे लागला; अमुक-अमुक वस्तू कशी निर्माण झाली, कशापासून झाली, जगामध्ये देव असतो म्हणजे काय, देव खराच आहे का इ. गोष्टींच्या मागे तो लागला आणि त्यामुळे वस्तूच्या अंतर्भूत असलेल्या ज्ञानाला मुकला. उदा. गुरुत्वाकर्षण बघा, अमक्या वस्तूला गुरुत्वाकर्षण असते तर ते कसे सिद्ध होईल अशा प्रश्नांच्या मागे लागला; पण त्यातून हे गुरुत्वाकर्षण का आहे हे समजू शकला नाही म्हणून असे बाह्यातील ज्ञान उपयोगी नाही खऱ्या ज्ञानाची महती आहे. (बंडफोर्ड)

- स्वाधिष्ठानाचे त्रास बहुतेक वेळा अति विचारांमुळे होतात. त्यामुळे स्वाधिष्ठानाचे व त्यांच्याशी निगडीत अवयवांकडे दुर्लक्ष होते आणि सर्व शक्ती मेंदूला विचारासाठी अधिक पेशींचा पुरवठा करण्याकडे लागते. त्याच्यामुळे इतर अवयवांना शक्ति-पुरवठा पुरेसा होत नाही. परिणाम म्हणून क्षीण प्लीहामुळे रक्ताचा कर्करोग व क्षीण स्वादुपिंडामुळे डायबेटिस होतो. ज्या व्यक्तीला आपणस सर्व काही गोष्टींना जबाबदार आहोत असे वाटते. जी जास्त विचारांत अडकते, जास्त योजना करण्याच्या मागे लागते त्याव्यक्तीचा अहंकार बळावतो आणि परिणाम स्वरूप त्याची डावी बाजू फार कमकुवत होते आणि त्याचे रोग उत्पन्न होतात. विशेष करून यकृताचे त्रास निर्माण होतात (बेडफोर्ड)

- परमात्म्याची सर्वव्यापी शक्ती प्रेम हीच आहे.हीच वैश्विक जाणीव. ब्रह्माच्या उत्पत्ती, सांभाळ आणि विनाश अशा तीन शक्ती आहेत. ब्रह्म हे परिपूर्ण तत्त्व आहे म्हणून स्वयंसिद्ध आहे; त्याची तुलना होऊ शकत नाहीं. ओम किवा Amen हे त्याचा निर्देश करतात. त्याचे अस्तित्व व स्पंदन कणाकणांत पसरलेले आहे आणि तेच विश्वातील समस्त वस्तुमात्रांचा परिपोष करते; आणि तरीही सर्वांपासून अलिप्त राहते. ब्रह्माचे मंदिर फक्त पुष्करलाच आहे. (कॅक्स्टन हॉल प्रवचन )

- अति-विचार स्वाधिष्ठान चक्राला त्रासदायक होतात; आणि खऱ्या शांतीमध्ये व्यत्यय आणतात. त्यासाठीच कुंडलिनीचे जागरण आवश्यक आहे. दैवी शक्तीचे वा गुणांबद्दलचे विचार गहनतेच्या प्रगतीला मदत करतात. सामान्य, भौतिक जीवनाबद्दल येणारे विचार प्रगतीमधे आडकाठी आणतात. ध्यानाच्या आधी आणि ध्यानानंतर थोडावेळ शांत रहा. विचार हे बहुतेक वेळा अहंकार वा प्रति-अहंकारामुळें येत असल्यामुळे आज्ञाचक्राला बाधक होतात. त्यावेळी -हम् क्षम् हा मंत्र उपयोगी ठरतो. सलग निर्विचारतेत उतरण्याचा प्रयत्न करावा. (कबेला)

# श्रीमाताजींचे इटलीत आगमन, दि. १८ जून २००६














## प्रेममयी १००० महिने गौरव समारंभ, दि. २१, २२ जुलै २००६














## गुरुपौर्णिमा इटली, जुलै २००६













## कबेला प्रोग्राम दि. २८ जुलै २००६













- खरी कला आपले विचार कमी करते वा थांबवते. ज्या कलाकृतीला व्हायब्रेशन्स जाणवतात ती चांगली. पाश्चात्य कलेमधें बरेच वेळा निकृष्ठ भावना दाखवल्या जातात. ज्या कलाकृतींमध्ये चैतन्य असते त्याच काळाच्या प्रवाहांत टिकून राहतात. इटालीय मूर्तिकार व चित्रकार यांच्या कला खूप प्रसिद्ध आहेत. (कॅक्स्टन हॉल)

- खरी कला कलाकाराच्या हृदयांतून व आत्मानंदामधून निर्माण होते. (कॅक्स्टन हॉल)

- सहजयोग्याने दुसऱ्याला आजार बरे होण्यासाठी मदत केली तर त्याचा उपयोग होतो हा सहजयोग्याचा गौण फायदा-बायप्रॉडक्ट आहे. महत्त्वाचे लक्षात घ्यायचे म्हणजे तो स्वत: काहीच करत नसून आत्मसाक्षात्कारी असल्यामुळे हे आपण करू शकतो हे त्याने नीट लक्षात घेणे; कारण खरे तर ते परमचैतन्यच करत असते. माझ्याकडे पहा; मी शांत असते कारण मी काही करते असे मला वाटतच नाही. पण म्हणजे मी नुसती बसून राहते असा याचा अर्थ नाही. म्हणून आजाऱ्याला ट्रीटमेंट द्यायच्या मागे लागल्यासारखे करू नका. त्यातून तुम्हालाच त्रास होतील (गणपतीपुळे)

- सहजयोगात उंचीवर (स्थितीवर)पोचलेल्या लोकांकडे पहा. तसेच त्यापैकी काहीजण बाहेर का टाकले गेले तेही पहा. त्यातून तुम्हाला खूप काही शिकता येईल. सहजयोगामध्ये अनुभवातूनच सर्व काही शिकायचे असते (जर्मनी)

- सहजयोगाचे पूर्ण ज्ञान मिळवण्याचा सतत प्रयत्न करा. मी जे-जे काही सांगत आले आहे ते सर्व टेपमध्ये रेकॉर्ड झालेले आहे. तुम्ही त्या टेप्सचा अभ्यास केलात तर सर्व समजेल; त्याचा अर्थ नीट समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे; महत्त्वाच्या गोष्टी लिहून ठेवाव्या. एकमेकात चर्चा करत जावे. (Melicharge आगमन)

- सहजयोग्याने सतत मध्यामधे (संतुलनात)राहिले पाहिजे. लहान मुलासारखे आणि लहान मुलाप्रमाणें या वागण्यातला फरक जाणला पाहिजे. (Child like and Childish)

- मुलांसारखे पण प्रगल्भता मिळवलेली व्यक्ती बनले पाहिजे. अशी व्यक्ती आपला आत्मसन्मान राखते. हे झाल्याशिवाय लोकांवर तुमचा प्रभाव पडणार नाही.नवीन भेटणाऱ्या लोकांनाही तुमची ही आत्मगौरवाची स्थिती जाणवली पाहिजे. (कॅक्स्टन हॉल)

- परमेश्वराने तुम्हाला या विशेष कार्यासाठीं खास निवडले आहे याचे भान तुमच्यामध्ये जागृत असले पाहिजे. (पाटकर हॉल, दिल्ली)

●●●



# संत ज्ञानेश्वर आणि भावंडे

पैठणजवळ आपेगाव नावाच्या गावी एक योगीपुरुष होऊन गेले.त्यांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी. ते सतत रानोमाळ जाऊन ईश्वर दर्शनाच्या इच्छेने ध्यान लावून बसत. असेच एकदा इंद्रायणी नदीच्या काठी सिद्धेश्वराच्या सान्निध्यात ध्यान करीत असतांना, विठ्ठलाचे निस्सीम भक्त सिद्धोपंत कुलकर्णी यांनी त्यांना पाहिले. त्यांनी विठ्ठलपंतांची आस्थेने चौकशी करून त्यांना आपल्या घरी नेले. त्यांनी त्यांच्या उपवर मुलीसाठी त्यांना विचारले. विठ्ठलपंतांनी नकार दिला. परंतु रात्री प्रत्यक्ष पांडुरंगाने त्यांना स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितले की, सिद्धोपंतांची मुलगी रुक्मिणी हिच्याबरोबर विवाह करून तिचा पत्नी म्हणून स्वीकार करावा. कारण पुढे रुक्मिणीच्या पोटी जन्मास येणारे प्रत्येक बाळ हे ईश्वराचे अंश असणार आहे. पांडुरंगाची आज्ञा प्रमाण मानून विठ्ठलपंत लग्नास तयार झाले. आपेगाव येथे विठ्ठलपंत आपल्या आईवडिलांसह राहू लागले. रुक्मिणी संसार नीटनेटका करीत असे. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. विठ्ठलपंतांच्या आई-वडिलांना देवाज्ञा झाली. त्यामुळे ते अतिशय दु:खी झाले. त्यामुळे रुक्मिणीच्या वडिलांनी दोघांना आळंदीला आपल्या घरी आणले. संसारात विठ्ठलपंतांचे मन लागत नव्हते. मन वैराग्याकडे ओढा घेऊ लागले. ते वारंवार रुक्मिणीला म्हणत, मी संन्यास घेतो. एकदा रुक्मिणीने कामाच्या नादात नुसतं हं म्हटले. पडत्या फळाची आज्ञा म्हणून, ते घराबाहेर पडले. ते त्यांनी संन्यासच घेतला.

ते थेट काशीला गेले. ते रामानंद स्वामींच्या आश्रमात राहू लागले. त्यांच्याकडून संन्याशाची दीक्षा घेतली.ते मनोभावे गुरुंची सेवा करीत. लवकरच ते त्यांचे आवडते शिष्य बनले. रामानंद स्वामींनी बरीच जबाबदारी त्यांच्या अंगावर टाकून स्वामी स्वत: तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले. अनेक तीर्थस्थळांना भेटी देत देत ते आळंदी येथे आले. तेथे सिद्धेश्वराचे पूजन करून बाहेर अश्वत्थ वृक्षाच्या ओट्यावर, ईश्वराच्या चिंतनात मग्न असतांना, तेथे नेहमीप्रमाणे रुक्मिणीबाई अश्वत्थ वृक्षाला प्रदक्षिणा घालायला आल्या.त्यावेळी रामानंदस्वामींना त्यांनी नमस्कार केला. स्वामीं-नी त्यांना -पुत्रवती भव-! असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद ऐकून त्यांच्या डोळ्यात पाणी आले. रुक्मिणीबाईंनी त्यांना आपली सर्व कहाणी ऐकविली.त्यावर रामानंदस्वामींनी ओळखले की हा आपला नवा शिष्य म्हणजेच या पतिव्रतेचा पती आहे. त्यांना असे वाटले की गृहस्थाश्रमी व्यक्तीस संन्यास दीक्षा देऊन आपल्या हातून चूक झाली आहे. या विचाराने ते तत्काळ काशी येथे परत गेले. तेथे त्यांनी विठ्ठलपंतांना घरी परत जाऊन संसार करण्याची आज्ञा केली. प्रत्यक्ष आपल्या गुरूनीच आज्ञा केल्यामुळे, विठ्ठलपंत संन्यास सोडून परत आळंदी येथे आले व संसार करू लागले. पण कट्टर ब्राह्मणांनी या वैराग्यशील, ज्ञानसंपन्न अशा विठ्ठलपंतांवर बहिष्कार टाकला.

त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव,सोपान, मुक्ताबाई ही चार अपत्ये झाली. रामानंद स्वामींचा आशीर्वाद खरा ठरला म्हणून रुक्मिणीबाईंना खूप आनंद झाला. आपल्या मुलांतच त्या ईश्वर पाहू लागल्या. त्यांचे पालनपोषण मनापासून आनंदाने करू लागल्या. उपजतच ज्ञानी आणि बुद्धिमान असलेल्या या चारही

मुलांचे संगोपन करताना त्यांनी जननिंदेची, हेटाळणीची, कुचेष्टेची, मानापमानाची कधीच पर्वा केली नाही.

माता रुक्मिणी व पिता विठ्ठलपंतांना वाटे, आपल्या मुलांकडे दैवी संपत्ती आहे. त्यामुळे आपल्या मुलांना लोकांकडून असा त्रास होणार नाही. पण त्यांच्या अपेक्षेपेक्षा उलटेच घडले. मुले थोडी मोठी झाल्यावर ती बाहेर समाजात जाऊ येऊ लागली तेव्हा संन्याशाची पोरे म्हणून त्यांचा उपहासच होऊ लागला. गावातील लहान-मोठी, स्त्री-पुरुष सर्वच त्यांची हेटाळणी करीत असत. कोणी त्यांना जवळ येऊ देत नसे. आपल्यात मिसळू देत नसे. परंतु ही ज्ञानी, विचारी, सद्‌गुणी परिस्थितीचे परिशीलन करणारी मुले या गोष्टी मनाला लावून घेत नसत.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. या म्हणीप्रमाणे या बालकांच्या बाललीलांमधून परमार्थाच्या गोष्टी दिसून येत होत्या. सर्वांचेच वागणे हे एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे होते. मातापित्यांचे भक्तीचे संस्कार लहानपणापासूनच त्यांच्या मनावर घडून येत होते. सर्वांचे चित्त स्थिर असे. शांतता व प्रसन्नता सतत त्यांच्या आश्रयाला होती.त्यामुळेच समाजाकडून होणारी निंदा किंवा छळ यांचा त्यांच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही.

आईवडिलांच्या छत्रछायेखाली चारही मुलांचे जीवन फुलांसारखे फुलत होते. उमलत होते. गावच्या बहिष्कारामुळे ही मुले आपल्या कुटी-भोवतीच खेळत. आपल्यातच बाललीला करत. त्यांना शिकवण्यास कुणीही तयार होईना. मग वडिलांनीच त्यांचे शास्त्राध्ययन सुरू केले. ही मुले सायंकाळी धर्मग्रंथ वाचत. आपल्या मातापित्याबरोबर परमार्थावर चर्चा करत. त्यांचे बोलणे, त्यांची ज्ञानग्रहण करण्याची शक्ती, त्यांची प्रगल्भता ही सर्व संतत्वाची लक्षणे पाहून मातापिता दोघेही मनातून अत्यंत आनंदी होत.

आता आपल्या मुलांच्या मुंजी करायला हव्यात म्हणून विठ्ठलपंत ब्राह्मणांना विचारायला गेले. संन्याशांच्या मुलांच्या मुंजी करता येत नाहीत असे सर्व ब्राह्मणांनी सांगितले. त्यामुळे त्यांना अतिशय दुःख झाले. येथे रहाण्यापेक्षा तीर्थयात्रेस जावे असे त्यांना वाटले. आपल्या मुलांना गावकऱ्याकडून अधिक त्रास होऊ नये म्हणून त्या दोघा पति-पत्नींनी त्र्यंबकेश्वरी जाऊन तेथे तपश्चर्या चालू केली. तेथे विठ्ठलपंत सर्व कुटुंबीयांना म्हणाले, बह्मगिरीला प्रदक्षिणा घालूया. पण मार्ग खडतर आहे. वाटेत हिंस्त्र श्वापदे असतात.त्यावर ज्ञानदेव म्हणाले, नाहीतरी समाजातील श्वापदे आपल्याला कमी छळतात कां? त्यापेक्षा ही बरी. नेमके प्रदक्षिणा घालत असतांना एक वाघ त्यांच्या सर्वांच्या मागे लागला.सारे जण जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळाले. सगळ्यांची चुकामूक झाली. निवृत्ती एका गुहेत शिरले. तेथे गहिनीनाथ होते. निवृत्तींनी गहिनीनाथांच्या चरणी मस्तक ठेवून आशीर्वाद घेतला. गहिनीनाथांनी निवृत्तींना ब्रह्मबोध करून त्यांच्या मस्तकी हात ठेवला व त्यांना आत्मज्ञान दिले. गहनीनाथांनी निवृत्तींना सांगितले की मी दिलेले ज्ञान तू ज्ञानेश्वरांना दे. ते साऱ्या जगाचा उद्धार करतील. जवळजवळ सात दिवसांनी निवृत्तिनाथ परत आले व साऱ्या कुटुंबीयांची भेट झाली.

निवृत्तिनाथांनी आपला धाकटा भाऊ ज्ञानेश्वर याला हे आत्मज्ञान दिले. आता ज्ञानेश्वर अधिकच तेजस्वी दिसू लागले. नंतर ज्ञानेश्वरांनी सोपान व मुक्ताबाईला आत्मज्ञान दिले.

पुढे प्रवास करीत ते सर्वजण पैठणला आले. विठ्ठलपंतांना आशा होती की, पैठणला कदाचित मुलांच्या मुंजी होतील. पण तेथील ब्राह्मणांनीही मुलांच्या मुंजी करण्यास नकार दिला. शेवटी आळंदीला आल्यावर तेथील ब्राह्मण पंडितांना विठ्ठलपंत अतिशय कळवळून म्हणाले , मुलांचा काय अपराध? ब्राह्मण म्हणाले, ती संन्याशाची मुले आहेत , हाच त्यांचा

अपराध. विठ्ठलपंत म्हणाले, यावर मी आपण सांगाल ते प्रायश्चित्त भोगायला तयार आहे. त्यावर ते पाषाण-हृदयी ब्राह्मण म्हणाले यावर एकच शिक्षा. ती म्हणजे देहान्त प्रायश्चित्त.

विठ्ठलपंत घरी परतले ते मनाशी काही निश्चय करूनच. रात्री सर्व मुले झोपली असतांना दोघां पति-पत्नींनी आपल्या मुलांकडे डोळे भरून पाहून घेतले, आणि नदीकडे प्रस्थान केले. रात्रीच्या काळोखात दोघांनीही डोहात स्वतःला झोकून दिले. सकाळी मुले जागी झाल्यावर पाहतात, ते आई-वडील नाहीत। निवृत्तिनाथांनी अंतर्ज्ञानानेच जाणले. त्यांनी सर्वांना धीर दिला. मुलांनी याबद्दल कुणालाही दोष दिला नाही ब्राह्मणांना दोष दिला नाही. ती समाजावर चिडली नाहीत. मनातून दुःखी झाली पण चरफडली मात्र नाहीत. शास्त्राबद्दल त्यांनी एकसुद्धा वाईट शब्द उच्चारला नाही.

विठ्ठलपंतांनी देहांत प्रायश्चित्त घेऊनही मुलांच्या मुंजी झाल्या नाहीतच. आता स्वतः मुलांनी ब्राह्मण पंडितांसमोर न्याय मागायचे ठरविले. आळंदीतील ब्राह्मणांनी पैठणमधील ब्राह्मणांकडे त्यांना न्याय मागण्यासाठी पाठविले. तेव्हां मुलांनी पैठण गाठले. एवढे मोठे विद्धान पंडित . कुणी हसत होते, कुणी कुचेष्टा करत होते.

एवढ्याशा वयातील या धैर्यवान तेजस्वी बालकांबद्दल त्यांच्या मनात सहानुभूती, दया या भावना तर नव्हत्याच. उलट तुच्छ भावना, कुचेष्टा, टवाळी यांनी त्या ब्राह्मणांचे संवाद भरलेले होते. पैठण हे त्याकाळी गाजलेले धर्मपीठ म्हणून ओळखले जाई. परंतु तेथे हिंदु धर्मच नव्हे तर सर्वच धर्माचा आत्मा असलेला मानवधर्मही त्या ब्राह्मण पंडितांना कळला आहे असे दिसत नव्हते. निवृत्तिनाथांनी परत एकदा अत्यंत नम्रपणे त्या विद्धानांना विनंती केली, परंतु त्यांनी अनेक धर्मग्रंथ वाचले, व नंतर सांगितले,

नाही प्रायश्चित्त उभय कुळ भ्रष्ट । बोलियेले पूर्वापार या एक उपाय शास्त्र मते । अनन्य भक्ती ते अनुसरावे ॥ तीव्र अनुतापे करावे भजन । गोखर आणि श्वान वंदोनिया ॥

जन्मापासूनच योगी असलेल्या या भावंडांना या निर्णयाने अजिबात दुःख झाले नाही. उलट आनंदच झाला.या बालयोग्यांनी निराशेचे सावटही मनावर येऊ न देता निर्भयपणे, विनयाने, आपल्या परमात्मज्ञानाचे, योग सामर्थ्याचे दर्शन घडविले. ज्येष्ठ बंधू आणि गुरू निवृत्तीनाथांच्या परवानगीने ज्ञानेश्वरांनी त्याविद्धान पंडितांसह जमलेल्या सर्वच लोकांना आपल्या अंगच्या दिव्यशक्तीने अवाक् करून टाकले.

रेड्याच्या पाठीवर आसुडाने मारलेले फटक्यांचे वळ ज्ञानेश्वरांनी आपल्या पाठीवर उठलेले सर्वांना दाखवून दिले; आणि मानव व प्राणी यांच्यातील आत्मा एकच आहे हे सिद्ध केले तसेच रेड्याच्या तोंडातून वेदपठण करवून घेऊन विद्धानांना आपली अध्यात्मशक्ती दाखवून दिल्यावर त्या विद्धानांच्या माना शरमेने खाली गेल्या. सारे ज्ञानेश्वरांना शरण आले. सार्‍यांनी या बालकांच्या जयजयकाराच्या घोषणा केल्या.

प्रमुख धर्माधिकाऱ्यांने ज्ञानेश्वरांना जवळ घेऊन कुरवाळले आणि सांगितले की जी बालके स्वयंशुद्धच आहेत, त्यांना आणखी शुद्ध काय करायचे? एवढे बोलून त्यांनी स्वतःच ज्ञानेश्वरांना साष्टांग दंडवत घातला. त्यानंतर पैठणच्या ब्राह्मणांनी एकमुखाने शुद्धिपत्र तयार करून ते ज्ञानेश्वरांच्या हाती दिले. त्यांनी ज्ञानेश्वरांना सांगितले की, तुम्ही चारही भावंडे अत्यंत पवित्र आहात. तुम्हाला कोणतेच प्रायश्चित्त घ्यायची गरज नाही. ज्या धर्मप्रचाराच्या कार्यासाठी तुमचा जन्म झाला आहे, त्या धर्मप्रचाराच्या कार्यास सुरूवात करावी.

मग पैठण क्षेत्री मुक्कामी असतानाच त्या विद्धान पंडितांच्या साक्षीनेच भावंडांनी धर्मप्रचाराच्या कार्यास सुरूवात केली. ज्ञानेश्वरांना गीता फार आवडायची. सर्व

गीता त्यांना पाठ होती. निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांना म्हणाले, आपण सर्व जण तीर्थयात्रेला जाऊ, ज्ञानेश्वरा तू ठिकठिकाणी भजन, प्रवचन कर. तुझे मुख हे प्रत्यक्ष सरस्वतीचे निवासस्थान आहे. तू लोकांना ज्ञान दे. गीता संस्कृत भाषेत आहे. त्यामुळे लोकांना त्यातील श्लोकांचा अर्थ समजत नाही. म्हणून तू मराठीत ओव्या रचून गीता सांग. लोकांपुढे ज्ञानाचे भांडार उघडे कर. ज्ञानेश्वरांना हे पटले. मग सर्वजण निघाले. ज्ञानेश्वरांचा नुसता आवाज ऐकूनच सर्वांना समाधान मिळे. आंतरिक आनंद मिळे.

ज्ञानेश्वरांनी लोकांना भक्तिमार्गाची शिकवण दिली.आता सर्व भावंडे पैठणहून निघाली. मजलदरमजल करीत नेवासे येथे महादेवाच्या देवळात पोहचली. हे गाव प्रवरा नदीच्या किनाऱ्यावर आहे. तेथील महादेवाच्या देवळात ही भावंडे राहू लागली.

नेवासे येथे असताना मृत झालेल्या सच्चिदानंदाच्या सती जाणाऱ्या विधवेस -सौभाग्यवती भव-असा ज्ञानेश्वरांनी आशीर्वाद दिला, आणि मृत सच्चिदानंदास परत जिवंत केले. याच सच्चिदानंदानी ज्ञानेश्वरीच्या सर्व ओव्या लिहून घेण्याचे काम मोठ्या आनंदाने केले. ज्ञानेश्वर तोंडाने ओव्या म्हणत व सच्चिदानंद ते लिहून काढत असत.

ज्ञानेश्वरी लिहून झाल्यावर पुढे जाताना वाटेत एका दगड -मातीच्या मशिदीस बोलावयास लावून ज्ञानेश्वरांनी तेथील फकिराचा अहंकार दूर केला.

गावोगावी भजन,प्रवचन कीर्तन करीत करीत ही भावंडे गोदावरी नदीच्या तीरावर आली. तेथे चांगदेव नामक तपस्वींचा आश्रम होता तेथे मुक्ताई व ज्ञानेश्वरांनी आपल्या योगसामर्थ्याने तेथील लोकांना चकित केले. तेथील अनेक प्रेते जिवंत झाली.जिकडे तिकडे या भावंडांची कीर्ती पसरू लागली. चांगदेव समाधी लावून बसल्यामुळे त्यांची या भावंडाशी भेट झाली नाही.

हळू हळू भावंडे आळंदीच्या मार्गाकडे लागली. या मुलांचे योगसामर्थ्य, परमार्थज्ञान याविषयीची कीर्ती आळंदीतही येऊन पोहोचली होती. त्यामुळे आता पैठणचे शुद्धिपत्र दाखवून आम्हाला शुद्ध करून घ्या म्हणण्याचे काहीच कारण नव्हते. उलट हे योगी आपल्या गावचे आहेत याचा आळंदीकरांना आनंद झाला. आळंदीतील लोकांनी अतिशय प्रेमाने त्यांचे स्वागत केले.

पुढे एकदा चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना पत्र लिहायला घेतले. मायना काय लिहावा हेच सुचेना ! कारण ज्ञानदेव वयाने लहान पण ज्ञानाने महान ! मग त्यांनी तो कागद कोराच पाठवून दिला ज्ञानेश्वरांकडे. निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांना सांगितले, सिद्धीच्या ताठ्याने भरलेला आणि अहंकाराच्या आहारी गेलेला चांगदेव ब्रह्मज्ञानाविषयी कोरडा आहे. त्याच्या अंतरास बोध होईल असे उत्तर तूच त्यांना लिही.

गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानून ज्ञानेश्वरांनी ज्ञानाचे निरूपण करणारे पत्र ६५ ओव्यात लिहून त्यांना पाठविले. हे ६५ ओव्यांचे पत्र म्हणजेच चांगदेव पासष्टी होय. ते पत्र चांगदेवांनी वाचले. त्यांना अर्थबोध झाला नाही. चांगदेव वाघावर बसले. हातात सळसळणारा साप घेतला आणि निघाले ज्ञानेश्वरांना भेटीला. स्वत:चे सामर्थ्य सिद्ध करायला. त्यावेळी निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई हे चौघेजण एका भिंतीवर बसले होते.ज्ञानेश्वरांना चांगदेवांचा हेतू कळाला. ज्ञानेश्वरांनी ते चौघेजण ज्या भिंतीवर बसले होते, ती भित आपल्या योगसामर्थ्याने चालवली. त्यावर चांगदेवांना ज्ञानेश्वरांचे सामर्थ्य कळून आले. चांगदेवांनी आपल्यातील अहंकाराचा पराभव मान्य केला. आता त्यांच्यात

शिल्लक होता परमात्माभेटीसाठी उत्सुक मुमुक्षू. त्यांनी ज्ञानेश्वरांचे पाय धरले. आपल्याकडील सिद्धीमुळे आत्मसमाधान मिळत नाही हे त्यांना आता कळले होते. ही चिमुरडी भावंडे खऱ्या आत्मानंदात न्हाऊन निघाली आहेत हे त्यांनी जाणले.

ते ज्ञानेश्वरांना म्हणाले, मला आत्मज्ञान हवे आहे. आज ती प्राप्ती झाल्याशिवाय मी जाणार नाही. ज्ञानेश्वर म्हणाले, चांगदेवा, परमात्मप्राप्तीसाठी एक दिव्य करावे लागते. आहे तुमची तयारी? चांगदेव अधीरतेने म्हणाले, हो मी तयार आहे. ज्ञानेश्वर स्मित हास्य करीत म्हणाले, तुला प्रथम एक बळी द्यायची गरज आहे. चांगदेव म्हणाले , आहे मी तयार ! उद्या येतो मी बळी घेऊन. नंतर ते आपल्या मुक्कामी गेले. आपल्या सर्व शिष्यांना म्हणाले तुम्ही नेहमी मला म्हणता की तुमच्यासाठी प्राण ओवाळून टाकायची आमची तयारी आहे. तर मग तुमच्यापैकी कुणीतरी एकानेच बळी म्हणून तयार रहा. असे सांगून चांगदेव झोपी गेले. सकाळ झाली. त्यांनी शिष्यांना हाक दिली. बघतात, तो सारे शिष्य एका रात्रीत पळून गेलेले ! शेवटी ते ज्ञानेश्वरांना म्हणाले, मी हरलो. आपण माझाच बळी घ्यावा ही विनंती.

त्यावर ज्ञानदेव चांगदेवांना उत्तरतात, अरे मी तुला बळी मागितला तो माणसाचा नाही, तर तुझ्यातील -मी- चा, तुझ्यातील अहंकाराचा. पत्रातील ६५ ओव्यांमधून मी हेच सांगितले होते. पुढे ! त्या ओव्यांचे निरूपण करायला ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस सांगितले. तेव्हां ते निरुपण मुक्ताबाईने चांगदेवास केले.

ही चारही मुले लौकिक अर्थाने जरी लहान दिसत असली तरी ती असामान्य होती. त्यांना फार मोठ्या आत्मिक बळाची देणगी लाभली होती. त्यांना परमेश्वराच्या मायेची पाखर लाभली होती. मुक्ताबाईच्या खेळण्याच्या वयात तिच्या पारमार्थिक जीवनाची सुरुवात झाली होती. समाजकंटकांचे मन तिला कळू लागले होते. अंतिम विसाव्याची जाणीव ज्येष्ठ बंधू ज्ञानेश्वर यांनी करून दिली होती. तिला अध्यात्म हे वेगळेपणाने शिकवावे लागलेच नाही. न शिकवताही अध्यात्मातील गूढ विषयांवर ती सहजपणे बोलत असे.

नंतर सर्व भावंडे पंढरपूरला विठ्ठल रखुमाईच्या दर्शनाला आली. तेथे संत नामदेव, सावतामाळी, गोरा कुंभार, जनाबाई अशी बरीच संत मंडळी भेटली. त्यांच्याबरोबर तीर्थयात्रा करून ही सर्व भावंडे परत आळंदीला आली.

आता ज्ञानेश्वरांना वाटू लागले की आपले जीवित कार्य संपले. त्यांनी सर्वांची भेट घेतली. सर्वांचा प्रेमाने निरोप घेतला आणि निवृत्तिनाथांच्या परवानगीने जिवंतपणीच समाधी घेतली. यावेळी ज्ञानेश्वरांचे वय अवघे २१ वर्षांचे होते. तो दिवस कार्तिक वद्य त्रयोदशी १२९६ संत ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले, या घटनेला आता सातशेहून अधिक वर्ष पूर्ण झाली.

पावित्र्य, ज्ञान, विवेक, विनम्रता, दया यांची मूर्ती म्हणजे संत ज्ञानेश्वर । त्यांच्या वर्णनासाठी शब्द अपूरे पडतात. सर्वव्यापी चैतन्याचा अनुभव त्यांनी घेतल्यानेच ते सहज-भावाने हे विश्वची माझे घर असे म्हणू शकले.

श्री क्षेत्र आळंदी येथे समाधिस्थ होऊन आपल्या साऱ्या विश्वरूपी घरामध्ये अविरत पसरणाऱ्या चैतन्याचा स्त्रोत बनून राहिले. खरोखरी आजही श्रीक्षेत्र आळंदी येथे त्यांच्या समाधीच्या ठिकाणी या चैतन्यरूपी अमृतप्राशनाचा आनंद आपण घेऊ शकतो.

संत ज्ञानेश्वरांच्या पाठोपाठच, वर्षभरात सोपानदेव, मुक्ताई, निवृत्तीनाथ यांनीही आपल्या कार्यास पूर्णविराम दिला.

प्रकृति निर्गुण, प्रकृति सगुण, दीपें दीप पूर्ण एका तत्त्वे ।

रावोरंक कोहं न म्हणेचि सोहं, साकारले अहं न कळे तया ।

निजतत्त्व आप अवधाचि पारपाक, एका रूपे दीपक लावियेला ।

अव्यक्त आकार, साकर हे स्फूर्ति, जीवे शिवे प्राप्ती ऐसे केले ।

खरोखर, संत मुक्ताईच्या या अभंगाचा अर्थ म्हणजेच सहजयोग होय । या चारही भावंडांनी जे आत्मज्ञान भोवतालच्या जगाला द्यायला प्रयत्न केला, त्या सर्वांचे सार म्हणजेच, श्री माताजींनी आपल्याला दिलेले सहजयोगाचे वरदान होय !

● ● ●

# ईस्टर पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

इस्तंबूल - टर्की २१ एप्रिल २००२

आज येथे जीझस ख्राइस्ट व माता मेरी यांची पूजा करण्यासाठी आपण जमलो आहोत.

ख्रिस्तांची आई येथे आली आणि तुर्कस्थानात वास्तव्य केले हा एक मोठा योगायोग आहे. ख्रिस्तांना सुळावर चढविल्यानंतर त्यांचे येथे येणे आणि रहाणे हे आश्चर्यच नाही का? आईबरोबर ते येथे येऊन गेले असतील. असे म्हटले जाते की ते काश्मीरला गेले व त्यांचेबरोबर त्यांची आईही होती. जाता जाता ते तेथे गेले असण्याची शक्यता आहे.

आज आपण त्यांचे पूजन करणार आहोत. सहजयोगाला अनुसरून मेरी माता महालक्ष्मीचाच अवतार होत्या; त्यांनी आपल्या मुलाचा धर्मकारणासाठी त्याग केला. पण त्याची किंमत लोकांना समजली नाही. दुर्दैवाने त्यांचे दैवी व्यक्तित्व कोणालाच ओळखता आले नाही. ज्यांनी ख्रिस्तांना जन्म दिला अशा महान व्यक्तीची ओळख सहजयोगातूनच समजते. त्यांचा कोणी, विशेषत: इस्लामी जगतात आदर केला नाही हे मोठे दुर्दैवच. यामुळेच इस्लामी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान गौण आहे; त्याबद्दलचे अनुभव काही चांगले नाहीत. आम्ही परित्यक्त स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी संस्था काढली. त्यात विशेषत: मुस्लिम स्त्रियांची संख्या जास्त आहे, ही दु:खाची बाब आहे. मोहम्मदांनी सांगून ठेवले, 'तुम्ही मातेचा सांभाळ करा', तरीसुध्दा आठ-दहा मुले असणाऱ्या मातांची अशा संस्थेत संख्या जास्त आहे. तरीही संस्थेने त्यांना सामावून घेतले. क्षुल्लक अशा धार्मिकतेकडे आम्ही दुर्लक्ष करून त्यांना स्वीकारले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'मानव धर्म'; आम्हाला सर्व धर्मांना एकत्र बांधायचे आहे. हे कठीण काम आहे कारण एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या लोकांचा आदर करत नाहीत. हे सर्व विक्षिप्त वाटते. हा सद्भाव कोठेच दिसत नाही, ते प्रेम नाही. उलट सर्व एकमेकांशी भांडतात, झगडतात, हिंसाही करतात. देवाच्या व धर्माच्या नावावर हे जे चालले आहे, लोक एवढे क्रूर बनले हे सर्व मूर्खपणाचे, दु:खकारक आहे.

यावर एकच तोडगा, सर्वांना आत्मसाक्षात्कार देणे. ज्याला कुराणात 'मिराज' म्हटले आहे. पण ते हा 'मिराज' कुणालाही मिळणार नाही असे सांगतात. मोहम्मदसाहेबांना आत्मसाक्षात्कार प्राप्त होता, इतर कोणालाही नव्हता, पण याचा अर्थ त्या लोकांना त्याचा प्रतिबंध केला असे म्हणणे चुकीचे आहे. आत्मसाक्षात्कार हा सर्वांकरिता आहे. मग ते आफ्रिकेतील, इंग्लंडमधील, भारतातील व अमेरिकेतील कुठलेही असतील. त्यांना सर्वांना 'मिराज' मिळू शकेल. मानवाला एकमेकाविरुद्ध लढण्यासाठी निर्मिलेले नाही. जनावरे कधीही आपापसात भांडत नाही. मग माणसे का भांडतात? तेही धर्माच्या नावाखाली ! ख्रिस्तांचे अवतरण धमाचे एकत्व मिळविण्यासाठी झाले, पण ख्रिश्चन भांडू लागले, दुसऱ्यावर वर्चस्व करु लागले. परमेश्वराच्या व धर्माच्या नावावर भांडणे करू लागले, जगात एक प्रकारचा हा गोंधळच आहे.

आमचा धर्म हा वैश्विक आहे. एकच धर्म.आम्ही सर्व देव-देवतांचा मान राखतो, आदरभाव ठेवतो व त्यांची पूजा करतो, त्यांच्यातील एकत्व न समजण्याइतके आम्ही अडाणी नाही. आणि आत्मासाक्षात्कारानंतर ते सर्व आमच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर, आमच्या चक्रांवर आधिष्ठित आहेत. केवळ लोक इतिहास सांगतात म्हणून त्यांचे अस्तित्व आपल्या आत आहे म्हणून नव्हे तर ते एकत्रित विश्वाच्या उत्थानासाठी कार्यरत आहेत हे महत्वाचे.

पुनरुत्थान तेही स्वत:च्या देहासहित हा ख्रिस्तांच्या जीवनाचा गाभा आहे. त्यासाठी त्यांना अनेक यातना व अनेक दिव्यांना सामोरे जावे लागले. सहजयोग हा त्याच धर्तीवर आहे. आत्मसाक्षात्कार अर्थात उत्थानानंतर तुमच्या चुकीच्या कल्पना, पूर्वग्रह दूर

होऊन, एका विशेष जाणीवेत तुम्ही उतरता. हे सर्व घडवणे खडतर होते. भारतात किंवा कोठेही लोक अज्ञानाच्या अंधारात व एकमेकांच्या हेवेदाव्यात अडकले होते. ही द्वेष भावना भारतात नव्हे तर बाहेरही होती जसा 'हिटलरचा उदय' केवळ मानवजातीच्या हेटाळणीसाठी जणू हिटलरचा जन्म होता. सैतानी शक्तीच्या या अवताराने भयंकर अनाचार घडविला. ज्या तऱ्हेने त्याने मानवहत्या केली, तसा विचार कुठल्याही मानवात असणार नाही. लहान बालके, म्हातारे- कोतारे यांची गॅस चेंबरमध्ये अगदी निर्घृण हत्या केली. मी त्या जागेला भेट देऊ शकले नाही आणि ते मानवणारे नव्हते. पण माझे यजमान तेथे जाऊन आल्यानंतर सात दिवस आजारी होते. या सर्व त्याच्या कल्पना अमानवी विकृतीचा नमुनाच असावा. ज्यू लोकांना पकडून ठार मारण्यामागचा त्याचा हेतू अगम्यच होता. अशा अनेक विकृत घटना धर्माच्या नावाखाली घडल्या, सगळे काही; भयंकर. खरे तर धर्म हा तुम्हाला प्रेम करण्यास सांगतो. द्वेषभावना व हिंसाचार नव्हे. अजूनही हे सर्रास चालू आहे याचे आश्चर्य वाटते. केवळ सहजयोगच हा मूर्खपणा थांबवू शकेल. कारण शेवटी आपण सर्व मानव आहोत.

यासाठी ख्रिस्तासारखे तुम्ही तुमचे उत्थान घडवा आणि हे सहजयोगाद्धारेच शक्य आहे. मोहम्मदसाहेबांनी याला 'मिराज' असे संबोधले. पण ते कोणाला हवे? आणि याचा तिरस्कारच केला गेला आणि त्या लोकांचा नुसता छळ केला. केवळ अज्ञानाच्या अंधकारामुळे माझ्याविरुद्धही आरडओरड करतात. पण मी स्वत: खंबीर असून, प्रेम हेच माझे अस्त्र आहे लोकांत दुसऱ्याविषयीच्या द्वेषभावना, हेवेदावे पोकळ असून त्यामागचा धोका त्यांच्या लक्षात आला. त्यामुळे माझ्या कार्याला चालना मिळाली. असे अनेक लोक मिळाले तर या सर्व गोष्टी अस्तास जातील. पण कट्टर धर्माभिमानातून अजूनही हे प्रकार चालू आहे, का हे कळत नाही. कुठल्याही ईश्वराच्या नावाने असे घडते हे अत्यंत चूक आहे. त्यांना परमेश्वर व त्याचे प्रेम हे कळतच नाही.

ख्रिस्तांचे जीवन बघितले तर त्यांना ३३ व्या वर्षीच क्रुसावर चढवले गेले. त्यांच्या आईचाही छळ झाला. हे कां घडले तर ते प्रेमाची शिकवण देत होते, एकमेकांवर प्रेम करण्यास सांगत होते म्हणून. तुम्ही कुठल्याही प्रकारे लोकांना सहाय्य करा, पण त्यांच्याविषयी प्रेम ठेवा. त्यातूनच तुम्हाला दुसऱ्याकडून आनंद मिळेल व एकमेकांना जाणाल. एकदा का तुम्ही लोकांवर प्रेम करायला लागला की सर्व भ्रम नष्ट होतील. जरी तुम्ही ख्रिश्चन, मुस्लिम वा हिंदू म्हणून जन्मला असाल तरी तुम्ही एकमेकांना अलग का समजता? तुम्ही सर्वजण एकाच प्रकारे जन्म घेतला, सर्व काही चेहरा इ. सारखे आहे. मग हे वेगळेपण कशाला? मला वाटते ही एक राजकीय प्रणाली असून संकुचितपणाचा कळस आहे. ज्यामुळे देवाधर्माच्या नावावर हे सर्व खपवले जाते. याउलट सहजयोग हा सर्वांना एकत्र बांधणारा व देवतांचे एकत्व साधणारा योग आहे. समजा लांबच्या ठिकाणी दक्षिण आफ्रिकेत, बेनिनसारख्या ठिकाणी एक सहजयोगी होतो; त्यानंतर तेथे हजारोंनी सहजयोगी होतात. तेही तुमचे भाऊबंदच आहेत. तुम्ही तेथे गेलात तर ते तुम्हांला आपले आप्त किंवा आपली मुले समजून वागवतील, भले तुम्ही कोणत्याही धर्माचे वा कोठूनही आला असाल. त्यांचे हे प्रेम पाहून आश्चर्य वाटते. प्रेम करणे हा मानवाचा जन्मजात गुणच आहे. ही प्रेमशक्ती वा प्रेमाचा ठेवा प्रत्येक माणसात आहे. पण ही शक्ती एवढी क्षीण झाली की ते एकमेकाशी भांडतात, कधीकधी हत्या पण करतात. धर्माच्या नावाखाली हत्या घडविणे हे सर्वात मोठे पाप आहे. कदाचित त्यांना वाटते, त्यामुळे आपण स्वर्गात जाऊ. पण ते नरकात नक्की जातील याची लोकांना थोडी जाणीव होत आहे. पण हे अजून रोज घडतच आहे.

तर आपण सहजयोगी काय करू शकतो? तुम्ही कोणत्याही धर्मात जन्मला असाल. पण त्याचे बंधन असू नये. तुम्ही खऱ्या प्रेम व आनंदाच्या धर्माने बद्ध आहात.नाहीतर तुम्ही आपापसात भांडत रडतखुडत एकमेकांशी झगडत रहाणार? प्राण्यांचे तसे नाही, कुत्रीसुद्धा तशी नाहीत. केवळ एकमेकांचा द्वेष वाढवून दुसऱ्याला त्रास देऊन स्वत:वरही आपत्ती ओढवता.

सहजयोगाचे एवढे आशीर्वाद आहेत की तुमच्या

आत सर्व देवता आहेत, जागृत आहेत आणि त्या पूर्णतिशी तुम्ही युक्त आहात. कुठल्याही भंपक कल्पनांशी तुमचा संबंध नाही.

मेरी माता येथे येऊन गेल्या हे विशेष आहे. येथे त्यांचे वास्तव्य झाले मला माहीत आहे. येथे त्यांचे घरही आहे. त्यामुळे मला येथे येण्यात खूप आनंद होतो. म्हणून येथे त्यांचे पूजन करणे जरुरीचे आहे. शेवटी त्या ख्रिस्तांच्या माता आहेत. आईही आईच असते. मग ती ख्रिश्चन, हिंदू वा मुस्लीम आहे हे कशाला पहावे? अशी ही महान माता जिने आपल्या प्रेमापोटी, सर्व विश्वासाठी आपल्या मुलाचा आत्मत्याग स्विकारला. अशी धीराची, प्रेमळ, अखिल विश्वाची माता विश्वात इतरत्र दिसेल का? इथे येण्यात एक योगायोग आहे. थेट न जाता येथे वास्तव्य करण्याचे तिचे काय प्रयोजन असावे? येथे त्यांचे घर आहे तरी येथील ख्रिश्चन स्वत:चा पंथ सुरू करतील, ख्रिश्चन मुस्लिमांशी व मुस्लिम ख्रिश्चनांशी भांडतील. काहीही करा हे चालूच राहिले. एकमेकांना सहाय्य करण्याऐवजी हा गोंधळ चालूच राहिला.

भारतात अनेक महान व्यक्ती होऊन गेल्या;त्यांनी लोकांना प्रेमाची शिकवण दिली. तरी तेथेही झगडे आहेत. भारतात बरेच मुस्लिम व हिंदू सूफीसंत होऊन गेले. त्यांचे गुणगान लोक आजही करतात, पण त्यांचीही अलगपणे पूजा करून त्यांच्याच नावावर झगडतात, कारण त्यांच्यात मानवतेचा, प्रेमाचा, सहानुभूतीचा अभाव आहे. यामुळे एकमेकांवर प्रेम करण्यातील चाआनंद ते लुटू शकत नाही. चीन व भारत कोठेही जन्मला म्हणून काय फरक पडणार आहे? प्रत्येकजण मानव आहे. सर्वांना प्रेमशक्ती दिलेली आहे, ती प्रेमशक्ती तुम्हीही वापरा.

मी माझ्या यजमानासह चीनमध्ये गेले होते. त्यावेळी चिनींना भारतीय लोकांबद्दल आदर नव्हता. पण त्यांनी माझा खूप आदर केला हे बघून सर्वांना आश्चर्य वाटले. चिनी लोकांबद्दल तो एक भ्रम होता. मला तर ते अत्यंत कनवाळू, माझा तर मान ठेवणारे असे दिसले. मी उतरले होते त्या हॉटेलमधे माझ्या पायातील पैंजण हरवले(पडून गेले) ते त्यांनी परत पोष्टाने पाठविले. केवढा त्यांचा आदर व प्रेम!

महिलांच्या कॉन्फरन्सला मी गेले तेथेही थोडा उशीर झाला होता, विमानतळावर काही चिनी तरुण आले होते, त्यांनी माझे सामानसुमान स्वत:घेऊन मला तडक त्या सेमिनारला घेऊन गेले. नंतर ते दोन मोटारी घेऊन आले, एक माझ्यासाठी व एक व्हीलचेअरसाठी, व खरेदीसाठी उत्तम बाजारपेठेत घेऊन गेले, अगदी तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचवले. त्यांचे हे प्रेम, ही ममता पाहून कोण म्हणेल चिनी लोक भारतीयांविरुद्ध आहेत? खरे तर मी कधी त्यांना पाहिलेही नव्हते, पण ते सर्व काही विशेष होते. प्रेमाचा हा विशेष आविष्कारच होता. सर्व काही प्रेमातून घडते व ते तुम्हा सर्वांच्या आत असते.

होते काय तर एखादा राजकीय नेता येतो, काहीतरी कथा बनवतो, लोकांना सांगून भडकवतो आणि झगडे निर्माण होतात.जर्मनीत असेच घडले. पण आता ते बदलेल सर्व जगात परिवर्तन हवे; खूप त्रास सोसला, हा काही धर्म नव्हे, संतांची ही शिकवण नाही. लोकांत कटुता पसरवणे ही एक भयंकर राक्षसी वृत्ती आहे. प्रेमाचा व करुणेचा जो आनंद आहे तो तुम्ही जाणत नाही.

आंता चर्चेसबद्दल बघितले तर त्यांच्या समस्या म्हणजे एक कोडे आहे. त्यांचे जे नितिनियम काही का असोत, पण त्याचा त्रास बिचाऱ्या मुलांना भोगावा लागतो. शुद्ध प्रेमाचा त्यात अंशही दिसत नाही. शुद्ध प्रेम कोणालाही कळत नाही, खरे तर तो त्यांचा जन्मजात ठेवा आहे. पण शुद्ध प्रेम कुठेच दिसत नाहीं, सर्व कांही खेळखंडोबा आहे. त्यांना हे शोभत नाही. जनावरे तशी नसतात पण मनुष्य आपली सीमा सोडतो. जीवनातील सौंदर्याचा कलेचा हा ठेवा व त्यापासूनचा आनंद लोपला आहे. झगडणाऱ्यांना कोंबड्यासारखे कुठलेही चांगले दिसत नाही, फक्त झगडणे हेच समजते. एकमेकातही भांडतात. आपल्याच भावंडांना सतावतात. मग धर्माचे नाव कशाला घ्यावे? धर्माने काय साधले? ख्रिश्चन, हिंदू मुस्लीमच नाहीतर इतरही धर्मात सर्वत्र गढूळ वातावरण आहे. कलियुग असले म्हणून काय झाले? मला काही समजत नाही. तुमच्यातील प्रेमशक्तिला तिलांजली का देता?

ख्रिस्त सतत हेच सांगत. सर्व प्रेमाविषयी;

आपल्यासारखेच शेजाऱ्यावर प्रेम करा म्हणत- असा दुसरा कोणी दिसतो का? ख्रिश्चनांनी ख्रिस्तांची शिकवण घेतली, मुस्लीमांनी महंमदांची व हिंदूनी श्रीरामाची. पण त्यातून काय मिळवले? ते या प्रेषितांच्या जवळपास तरी वाटतात कां? त्यामागचे कारण माझ्या मते त्यांचा दोष नसून त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला नाही हेच आहे. आत्मसाक्षात्काराशिवाय तुम्ही काही समजणार नाही, कशातच आनंद वाटणार नाही, जर्मनीमध्ये जे घडले किंवा हिरोशिमाची झालेली अवकळा बघितली तर मला कंप सुटतो. हे बघवत नाही, भयंकर अमानुष. आताचे दिवस असे आहेत की स्वत:च्याच मुलांना ते मारायला निघालेत.

याउलट सहजयोगाकडे पहा, लोक एकमेकांवर अपार प्रेम करतात कारण ते सर्व मानव आहेत. तुम्ही एकमेकांवर प्रेम करा, एकमेकांना सावरा हाच त्याचा गाभा आहे. हे निर्माण झाले तर तुम्ही सशक्त असे सहजयोगी व्हाल. देवतांचेही तुम्हाला पाठिंबा व आशीर्वाद लाभतील. तुमच्यातील प्रेमापोटी त्या तुम्हाला तुमच्या समस्यातून अडथळे दूर करण्यात सहाय्य करतील. हीच कलियुगातील देणगी आहे. हे पूर्वी कधीही अस्तित्वात नव्हते.

तुम्ही स्वत: प्रेमळ असाल तर परमेश्वर अगदी पलीकडे जाऊन तुमच्या समस्या दूर करेल.जे तुम्हाला त्रास देतील त्यांचा समाचार घेईल. माझा तसा अनुभव आहे. मी कधी काही करत नसते, कुणाला त्रास देत नाही, कोणाचे वाईट चिंतीत नाही कोणाशी झगडत नाही वा ओरडत नाही. सर्व सहज घडते. मी कुठल्याही देवाला हे करा असे सांगत नाही. परमेश्वर हा सर्वांना महान न्याय देणार आहे. त्याच्या प्रेमाने व मार्गदर्शनाने कोणाचे यत्किंचितही नुकसान होणार नाही हे मी खात्रीने सांगते. हाच कलियुगाचा आशिर्वाद आहे. कलियुग भयंकर आहे, लोक बिघडलेले आहेत मान्य पण आता देवताच फार जागृत आहेत, फार दक्ष आहेत. या काळात ख्रिस्त असते तर त्यांना सुळावर चढविण्यात आले नसते. पण हाही एक कलियुगाचाच आशीर्वाद असावा. कोणीही छळणार नाही, कोणीही सतावणार नाही, फक्त तुम्ही नम्रता बाळगा. तुमचे चरित्र शुद्ध ठेवा. ईश्वराच्या या कृपावृष्टीचे असे अनेक चमत्कार लोक मला सांगतात. याचे मला बिलकुल आश्चर्य वाटत नाही. पण अशा सज्जन लोकांबाबत देवता आता जागृत आहेत हे मला ठाऊक आहे, ते तुमची काळजी घेतील. तुम्हाला आधार देतील, सर्वकाही घडेल. पूर्वी मोहम्मदसाहेबांना त्रास दिला, इतरांना दिला, पण आता शक्य नाही. आता सहजयोग्यांना कलसाच त्रास होणार नाही, मी खात्री देते कारण त्यांच्यावर स्वत: ईश्वराची मेहेरनजर आहे. अशा तऱ्हेची अशी अनेक पत्रे सहजयोग्यांकडून मला आली आहेत.

म्हणून प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा, सर्वांवर प्रेम करा. तुम्ही अत्यंत नम्र व प्रेमळ रहा. हेच प्रेम तुमच्या जीवनात उपयोगी ठरेल; हाच ख्रिस्तांचा संदेश आहे. ते म्हणाले ''त्यांना क्षमा करा त्यांना समजत नाही ते काय करत आहेत '' ज्यांनी त्यांना सुळावर चढविले अशा कृतघ्न लोकांबद्दलसुद्धां अत्यंत प्रेमाने ईश्वराकडे आर्जव करतात- हे पिता त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात हे त्यांना कळत नाही. केवढे हे प्रेमळ व्यक्तित्व.

एक दोन लोक सोडलेत तर जगातील ९० टक्के सहजयोग्यांमध्ये एकमेकांवरील प्रेम दिसून येते. - आम्ही सर्व प्रेमळ आहोत, या गुणांची आज पूजा, त्यांच्या पूजेबरोबर आपण करू या.

तुम्ही पूर्ण सक्षम असे सहजयोगी व्हावे, तुमच्यातील प्रेमशक्ती वाढण्यासाठी व त्यामुळे तुमचे जीवन संपन्न व्हावे यासाठी ईश्वर तुम्हाला शक्ती देवो- हेच तुम्हाला माझे आशीर्वाद . या प्रेमाच्या जाणीवेतून तुम्ही अनेक, चमत्कार घडवून आणाल.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद

● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

वर्ल्ड फाउंडेशन प्रोग्राम, दि. ८ जुलै २००६













# निराकार श्रीकृष्ण पूजा २००६, पुणे











